PlanetRead

Literacy for a Billion

Movie: Premasathi Vattel Te
Year: 1987

Song: Aasamant Aaj Dhund
Lyricist: Shantaram Nandgaonkar

आसमंत आज धुंद हा झाला
आसमंत आज धुंद हा झाला
मन मोकळी मज साद घाली
मन मोकळी मज साद घाली
मनविहंग चुंबितो या नभाला
आसमंत आज धुंद हा झाला
आसमंत आज धुंद हा झाला

सागर उसळे अनुरागाचा
सागर उसळे अनुरागाचा
प्रेम फुले वर्षितो हो हो
प्रेम दिवाण्या मंदाकिनीला
लाटांनी वेढितो
आज मनाचा बांध फुटला
आज मनाचा बांध फुटला
नकळत झंकारला हा तराणा
असा रंगलेला
आसमंत आज धुंद हा झाला
आसमंत आज धुंद हा झाला
मन मोकळी मज साद घाली
मन मोकळी मज साद घाली
मनविहंग चुंबितो या नभाला
आसमंत आज धुंद हा झाला
धुंद हा धुंद हा झाला

थरथरणाऱ्या पंखाना हया
थरथरणाऱ्या पंखाना हया
बळ नवखे लाभले
हो हो यौवन खुलले नंदित झाले
तुजपाशी धावले
श्रावण सरी का अवचित झडल्या
श्रावण सरी का अवचित झडल्या

मन मयुराचा पिसारा कसा हा
फुले प्रीत त्याला
आसमंत आज धुंद हा झाला
आसमंत आज धुंद हा झाला
मन मोकळी मज साद घाली
मन मोकळी मज साद घाली
मनविहंग चुंबितो या नभाला
आसमंत आज धुंद हा
धुंद हा धुंद हा झाला

*Disclaimer: PlanetRead does not own these lyrics and is not using them for any commercial purpose. For over 20 years, PlanetRead has been subtitling Bollywood songs for mass literacy. These lyrics are being offered as part of PlanetRead's literacy development initiative.*

*PlanetRead is a tax-exempt, not-for-profit: 501(c) (3) in the United States and 80(G) in India.*